**Second Semester Examination Paper 2025**
**Sub Code: N1112 (For Marathi Medium) – Answer Key**

**Std: IX** | **Sub: Marathi (R1)**
**Marks: 80** | **Duration: 3 hours**

**सूचना:**

- प्रश्न क्रमांक स्पष्टपणे लिहावेत.
- उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
- प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत.
- **भाग एक:** बहुपर्यायी प्रश्न (प्रश्न क्र. 1 ते 40) - 40 गुण
- **भाग दोन:** व्यक्तिनिष्ठ प्रश्न (प्रश्न क्र. 41 ते 59) - 40 गुण

**भाग एक: बहुपर्यायी प्रश्न – 40 गुण**

1. A
2. B
3. D
4. C
5. B
6. D
7. C
8. A
9. C
10. B
11. C
12. C
13. D
14. A
15. B
16. D
17. C
18. A
19. D
20. B
21. A
22. C
23. D
24. C
25. B
26. D
27. C
28. A
29. C
30. B
31. D
32. A
33. C
34. B
35. C
36. A
37. B
38. D
39. B
40. A

<u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. (8)

(प्रत्येकी 2 गुण) एकूण 8 गुण

41. भिवा दलित असल्यामुळे त्याला मागच्या बाकावर बसवले जाई. तरीही शिक्षक शिकवत असताना भिवाने तन्मयतेने प्रमेय समजून घेतले. त्या प्रमेयाशी एकरूप होऊन त्याने ते आत्मसात केले मात्र प्रमेय वर्गात समजावून सांगण्याची संधी भिवाला शिक्षकांनी दिली नाही म्हणून भिवाचा दबून गेलेला राग उफाळून आला.

42. राजा रविवर्मा यांनी चित्रकलेचा प्रसार भारतभर केला. त्याचबरोबर तत्कालीन महाराष्ट्रीय स्त्रियांची वेशभूषा नऊवारी साडी आणि साधी चोळी हाच पोशाख सीता, सरस्वती, लक्ष्मी, सुभद्रा, द्रौपदी या सर्वांना दिला. हा प्राचीनकालीन पोशाख नव्हता पण रविवर्मांमुळे अजरामर झाला.

43. सुधा रिसबूड यांनी दोन प्रकारच्या ज्ञानांचा उल्लेख केला, तो म्हणजे एक वंशपरंपरेने उत्क्रांत होत आलेले ज्ञान आणि दुसरे माणसाने स्वतःहून प्रयत्नपूर्वक साठवलेले व वृद्धिंगत केलेले ज्ञान. भाषा अवगत झाल्यावर माणसाने मौखिक परंपरेने ज्ञान जोपासले व जेव्हा त्याला लिपी सापडली तेव्हा त्याने पुस्तकांच्या रूपात ज्ञान साठवून ठेवले. पुस्तकातील ज्ञानात नंतरची माणसे भर घालीत गेली व अशा प्रकारे माणसाने स्वतःचे ज्ञान वृद्धिंगत केले.

44. गोधराज हा चतुष्पाद होता. त्यामुळे ससा, वराह,शेळी, मेंढी हे सगळे चतुष्पाद आपले बांधव आहेत असे त्याला वाटायचे. अशावेळी फक्त हरणांना अभय मिळणे हे गोधराजाला अपुरे वाटत होते म्हणून कोणत्याच चतुष्पापदाचे मांस खाऊ नये, अशी याचना गोधराजाने महाराजांपुढे केली.

45. लेखक प्रवीण बांदेकर संध्याकाळी पाऊस थांबताच गावात फेरफटका मारायला गेले असता पूर्वासाच्या देवळात दगडी बाकावर चार-सहा पोरे, म्हातारेकोतारे बसलेले त्यांनी पाहिले. सहसा या बाजूला कोणी फिरत नाही त्यातही अशा पावसात इथे माणसाचा वावर पाहून लेखकांना आश्चर्य वाटले. आप्पा तारी यांनी देवळात गणपतीची शाळा स्थापन केली होती म्हणून ते लोक जमले होते.

<u>कोणत्याही एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (3)

(संदर्भ -1गुण, स्पष्टीकरण -2 गुण) एकूण 3 गुण

46. <u>संदर्भ:</u> पाठाचे नाव - ''सर' लोकांच्या आठवणी', लेखकाचे नाव - आनंद नाडकर्णी.
लेखकांना शुभेच्छा द्यायला आलेल्या शिक्षकांनी गुलाबाची फुले देत असताना वरील उद्गार काढले.
<u>स्पष्टीकरण:</u> डॉ.आनंद नाडकर्णी यांच्यावर अनेक शिक्षकांचा ठसा उमटला होता. शिक्षकांनाही या गुणी, कर्तबगार विद्यार्थ्याविषयी आत्मीयता वाटत होती. जेव्हा लेखकांनी स्वतंत्रपणे स्वतःचा व्यवसाय सुरू केला तेव्हा त्यांचे दहावी-अकरावीचे एक शिक्षक त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आले. त्यांनी लेखकांना गुलाबाची फुले दिली आणि वरील उद्गार काढले. लेखक मनोविकारतज्ञ होते म्हणून त्याने फुलांच्या कोमलतेने रुग्णावर इलाज करावा आणि रुग्णांचे जीवन व स्वतःचा व्यवसाय फुलांप्रमाणे फुलवावा असे या शिक्षकांना सुचवायचे होते.

47. <u>संदर्भ:</u> पाठाचे नाव - 'प्रमेय', लेखकाचे नाव: बाबुराव बागुल. शालेय वयातील भिवाला त्याच्या शिक्षकांनी विचारलेला हा प्रश्न आहे.
<u>स्पष्टीकरण:</u> भिवाने लहान वयातही जातीयतेचे चटके सहन केले होते. असा भिवा शाळेत प्रार्थना ऐकतो. येशू ख्रिस्ताच्या कृपेची, प्रेमाची याचना करणारी ती प्रार्थना करुणेने ओथंबली होती. ही करुणा हाच आपला आधार आहे, असे वाटून त्याचे मन गहिवरते. त्याच्या डोळ्यांत अश्रू येतात. मात्र ते दृश्य पाहून शिक्षकांना वाटते की भिवाच्या घरी कोणीतरी आजारी असणार आणि त्या आठवणीने तो व्याकुळ झाला असावा म्हणून ते वरील प्रश्न भिवाला विचारतात.

<u>कोणत्याही एका</u> प्रश्नाचे उत्तर चार-पाच वाक्यांत लिहा. (3)

(प्रत्येकी 3 गुण) एकूण 3 गुण

48. लेखिका सिंधुताई सपकाळ यांना लंडनमध्ये आपल्या कामात हरवून जाऊन घड्याळाशी स्पर्धा करीत भल्या पहाटे साफसफाईचे काम करणारी एक म्हातारी बाई दिसली, तसेच लंडनची खडान् खडा माहिती असलेली एक आजीबाई भेटली. त्यांना पाहून त्यांना वाटले की ही माणसे स्वतःच्या पलीकडे जाऊन देशाचा विचार करतात. देशाला, शहराला स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी झपाटलेली असतात. आपल्या माणसांनीही देशासाठी असेच जगायला शिकले पाहिजे, बालकांच्या भवितव्यासाठी नियोजन केले पाहिजे असे विचार त्यांच्या मनात आले.

49. लेखक निंबाजीराव पवार यांनी राजा रविवर्मा यांच्या चित्रकलेचे वैशिष्ट्य सांगताना काही चित्रांचे वर्णन केले आहे. एका चित्रात शाकुंतला नाटकातील काव्यमय प्रसंग चित्रित झाला आहे. एका रम्य उपवनात वृक्षांना वेली लगडलेल्या आहेत. वेली स्वतः झोके घेत आहेत. हरीण, पाडसे बागडत आहे. हिरव्या मखमली गवतावर देखणी शकुंतला पहुडली आहे. डाव्या तळहातावर मस्तक, दृष्टी शून्यात. राजा दुष्यंताला पत्रात काय लिहायचे, असा संभ्रम. ही सर्व अवस्था विलक्षण प्रत्ययकारकतेने चित्रात व्यक्त झाली आहे.

<u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा. (4)

(प्रत्येकी 2 गुण) एकूण 4 गुण

50. भाताचे पीक चांगले आल्यामुळे यावर्षी पत्नीला एक चांगला दागिना घ्यावा असे शेतकऱ्याला वाटते. लग्न झाल्यापासून आपण तिला काही भौतिक सुख देऊ शकलो नाही, आपल्यासारख्या दारिद्र्य माणसाला तिने वरले, दारिद्र्यामुळे बाराही महिने आपण सुकट आणि डाळ खात आहोत, गरिबीमुळे आपल्या पत्नीला पंचपक्वान घालू शकत नाही याची टोचणी शेतकऱ्याच्या मनाला लागली आहे. अशा भावना शेतकऱ्यांनी आपल्या पत्नीसमोर व्यक्त केल्या आहेत.

51. सर्वत्र पाण्याचा दुष्काळ असल्याने जवळपासचे पाण्याचे साठे आटले आहेत त्यामुळे दूरवरच्या डोंगरकपारीत एक झरा आटत चालला आहे. स्त्रिया घागरी घेऊन चढणीचा घाट चढून-उतरून फार दमून गेल्या आहेत. त्यांच्या पायांत गोळे अन् डोळ्यांत अश्रू दाटले आहेत. उन्हाच्या झळांमुळे त्यांचा जीव एखादा कोंब सुकून जावा तसा वाळून गेला आहे. थेंब थेंब पाणी गोळा करत मुक्या झऱ्यापाशी त्या वेदनेने बोलत आहेत.

52. जफरची आई व कवींच्या आई स्वतः च्या घरांसाठी सारख्याच कष्ट उपसतात. जफरच्या घराच्या भिंती व कवींच्या घराच्या भिंती सारख्याच पोपडे निघालेल्या आहेत. जफरच्या भाजणीतले मीठ व कवींच्या घरातील डब्यातले मीठ सारखेच आहे. दोघांच्याही आमटीतले पाणी एकाच जमिनीतून येते. अशा प्रकारे जफर व आपल्या घरातील साम्य कवींनी व्यक्त केले आहे.

कोणत्याही एका काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (3)

(संदर्भ- 1 गुण, स्पष्टीकरण - 2 गुण) एकूण 3 गुण

53. संदर्भ: कवितेचे नाव - 'रापी', कवीचे नाव - आनंद गायकवाड. चर्मकाराचा छोटा व्यवसाय करणाऱ्या वडिलांच्या मनातील हतबलता व्यक्त झाली आहे.

स्पष्टीकरण: जातीमुळे चर्मकाराचा पारंपारिक छोटा व्यवसाय चालवणाऱ्या वडिलांना मुलगी म्हणते की, आपण बाटासारखा मोठा उद्योग का चालू शकत नाही. तिला उत्तर देताना वडील म्हणतात - ही जात आपल्याला जळूसारखी चिकटलेली आहे. जळू जसे रक्त शोषते, त्याप्रमाणे ही जात आपले आर्थिक व सामाजिक शोषण करीत आहे. या जळूरूपी जातीला कसे कापायचे ते मला कळत नाही.

54. संदर्भ: कवितेचे नाव - 'सरण', कवयित्रीचे नाव - प्रज्ञा पवार. स्त्रीच्या वाट्याला आलेल्या यातनांचे चित्रण.

स्पष्टीकरण: जनावरांपेक्षा उपेक्षित आयुष्य स्त्रीच्या वाट्याला आले आहे. अधिकारशून्य जगण्यामध्ये दुष्काळातल्या दगडधोंड्यासारखे गाठोडे तिच्या वाट्याला आले आहे. या दुःखभोगामध्ये आक्रदून ती आईला हाक मारताना म्हणते - माझ्या जीवनाची वाट काट्याकुट्याने भरलेली आहे. म्हणजेच वेदनांनी भरलेली आहे. ही वाट मी किती चालू ते उमजत नाही.

कोणत्याही एका प्रश्नाचे चार ते पाच वाक्यांत उत्तर लिहा. (3)

(प्रत्येकी 3 गुण) एकूण 3 गुण

55. कवीचा बाप कष्टकरी शेतकरी असल्यामुळे तो शेतात पहाटेपासून राबतो. एक वेळ पंढरपूरच्या वारीला जाण्याचा वारकऱ्यांचा नेम चुकेल पण कवीच्या बापाचा शेतात जाण्याचा नेम कधी चुकत नाही. सारे गाव पहाटेच्या स्वप्नात मश्गूल असते, तेव्हा तो रानात जातो. व्यवहारी जगातले प्रश्न त्याच्या ध्यानीमनी नसतात, तो त्यांच्यापासून एखाद्या दूरच्या घनदाट जंगलाप्रमाणे लांब असतो. 'शेतात जे उगवते ते माझे व जे सापडते ते दुसऱ्याचे' अशी त्याची साधी नीती आहे. आता तो वृद्ध झाला आहे, त्याचे जीवन मातीमोल झाले आहे, तरी या शेतकऱ्याची मातीवरची निष्ठा मात्र कायम आहे.

56. भिन्न धर्मीयांतील सामान्य माणसे सारखीच जगत असतात. काबाडकष्ट करून पोटापाण्याच्या ववंचनेत पायपीट करतात. एकमेकांचे सण आनंदाने साजरे करतात. त्यांच्यामध्ये सर्वधर्मसमभाव व माणुसकीचे नाते असते. प्रेमपूर्ण संबंध असतात. दोघांनाही सारखा सूर्यप्रकाश मिळतो व एकाच जमिनीतील पाणी मिळते. दोघांची तहानभूक एकसारखी असते. पण काही धर्मांध लोक स्वार्थासाठी दोन धर्मीयांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. असे महत्वाचे विचार वर्जेश सोलंकी यांनी 'जफर आणि मी' या कवितेत मांडले आहेत.

57. संवाद लेखन - (5)

सुरूवात, विषय मांडणी, समारोप, भाषाशैली हे मुद्दे लक्षात घेऊन गुण द्यावेत.

58. पत्रलेखन (5)

गुण देताना खालील गोष्टी विचारात घ्याव्यात.

| | |
|---|---|
| पूर्ण पत्ता - | 1 गुण |
| मायना - | 1/2 गुण |
| विषय व शिष्टाचार - | 1 गुण |
| विषय स्पष्टीकरण - | 2 गुण |
| शेवट - | 1/2 गुण |
| एकूण - | 5 गुण |

59. निबंध लेखन (6)

गुण देताना खालील गोष्टींचा विचार करावा.

| | |
|---|---|
| आकर्षक सुरुवात - | 1 गुण |
| विषय मांडणी - | 2 गुण |
| भाषा शुद्धता - | 1 गुण |
| भाषा सौंदर्य - | 1 गुण |
| आकर्षक शेवट - | 1 गुण |
| एकूण - | 6 गुण |